# बृहन्मुंबई महानगरपालिका

## पेन्शन अदालत - सूचना पत्र

<u>क्र.प्रले(को.)/एफपीपी/नप्र/८९</u>
दि.०७.०४.२०२१

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या सर्व खाते प्रमुख / विभागीय सहाय्यक आयुक्त / अधिष्ठाता रुग्णालय प्रमुख यांच्या स्तरावर पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात येत आहे. सदर विभागावर पेन्शन अदालतीमध्ये प्रथमत: महानगरपालिका निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातात त्यातूनही जी प्रकरणे मार्गी लागणार नाहीत अशाच प्रकरणांचा समावेश प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या उच्चस्तरीय पेन्शन अदालतीमध्ये करुन प्रलंबित प्रकरणांवर निर्णय घेतले जातात. सदर उच्चस्तरीय पेन्शन अदालत प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी आयोजित केली जाते. दि.१५.०४.२०२१(गुरुवार) रोजी सकाळी ११:०० ते १२:०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आलेली 'उच्चस्तरीय पेन्शन अदालत' कोरोना विषाणूचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी परिपत्रक क्र.एमओएम/११ दि.०५.०४.२०२१ अन्वये रद्द करण्यात आली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
दि.०७.०४.२०२१
**लेखा अधिकारी (एफपीपी)**